# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. २] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ८-१४, २०२६ : पौष १८-२४, शके १९४७ [पृष्ठे - ११

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.


# भाग एक–छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | ३१ ते ३६ |
| संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले. | ३६ ते ३८ |
| भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १ ते ३ |


# शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

१

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून**

**नगर विकास विभाग,**

**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक :-०३/०९/२०२५**

**अधिसुचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६. :-**

**क्र. टिपीएस-३५२५/१८३/प्र.क्र.१६/२०२५/नवि-३० :-** ज्याअर्थी, उमरगा शहराची (जि.धाराशिव) विकास योजना (मुळ हद्द + वाढीव हद्द) ( सुधारीत), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३४०९/५७३/प्र.क्र.७३/२००९/नवि-३०. दि. ०४/०४/२०१२ अन्वये मंजूर झाली असून ती दि. १५/०५/२०१२ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे उमरगा येथील सर्व्हे क्र.९ (पै.) मधील १.३७ हेक्टर (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधले आहे.) कृषी विभागामध्ये दर्शविली आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, उमरगा नगरपरिषद, जि.धाराशिव यांनी पत्र क्र. ३५१/२०२४, दि. १३/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) मध्ये दिलेली वैधानिक पध्दती अनुसरुन दि. १३/०६/२०२४ रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र. ०१ अन्वये उक्त विकास योजनेतील उक्त जमीन कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर केलेला आहे. (यापुढे "उक्त प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे.);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशी नंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त प्रस्तावित फेरबदल काही बदलांसह व काही अटीसह मंजूर करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, आता उक्त जमिनीच्या मालकांनी प्रचलित बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणाऱ्या उक्त जमिनीच्या एकुण रक्कमेच्या ५% दराने येणाऱ्या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमुल्याची ५०% रक्कम रु. १,९१,८००/- सहायक संचालक, नगर रचना, धाराशिव शाखा, धाराशिव यांच्या लेखाशिर्षामध्ये दि. ०४/०८/२०२५ रोजी जमा केलेली आहे, आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रु. १,९१,८००/- दि. ३१/०७/२०२५ रोजी उमरगा नगरपरिषदेकडे जमा केलेली आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकाराचा वापर करुन, उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्तावाखालील, मौजे उमरगा येथील सर्व्हे क्र.९पै. मधील १.३७ हेक्टर आर क्षेत्र शेती / ना-विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत मौजे उमरगा येथील सर्व्हे क्र.१०(पै.) मधील क्षेत्र १.६२ हेक्टर जागेसाठीच्या फेरबदलास, उक्त जमीन शेती / ना-विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेस काही अटीसह मंजूरी देत आहे, आणि त्यासाठी उपरोक्त दि. ०४/०४/२०१२ ची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे;

"विकास योजना मंजूरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सुचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

**नोंद**

"मोजे उमरगा येथील सर्व्हे क्र. ९पै. मधील १.३७ हेक्टर आर क्षेत्र, नकाशात दर्शविल्यानुसार, खालील अटींच्या अधिन राहून, शेती / ना-विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

**अट क्र. १** - प्रस्तावाधिन जागेपैकी कोणत्याही क्षेत्राचा विकास करताना, मंजूर *UDCPR* - २०२० या नियमावलीतील अनुषंगीक तरतूदीनुसार किमान १०% मनोरंजनात्मक खुली जागा (*Recreational Open Space)* प्रस्तावित करणेसह किमान १०% सुविधा क्षेत्र सोडणे तसेच सदर सुविधा क्षेत्रापैकी ५०% क्षेत्र बगीचा, क्रिडांगण इत्यादी स्वरुपाच्या खुल्या वापरासाठी कायमस्वरुपी राखून ठेवणे बंधनकारक राहील. तसेच उर्वरीत सुविधा क्षेत्राचा विकास, मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.३.५.१ नुसार करण्यात यावा.

**अट क्र. २** - मनोरंजनात्मक खुल्या जमिनीचा सुयोग्य विकास करुन, त्यास सिमाभितीचे बांधकाम करणे बंधनकारक राहील.

**अट क्र. ३** - प्रस्तुत जागेच्या दक्षिण हद्दीलगत स्थित पाण्याचा नैसर्गिक प्रवाह (नाला) हा त्याच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा न येता, मुळ स्वरुपात ठेवणे संबंधित जमीन मालकास/विकास कर्त्यास बंधनकारक राहील.

**अट क्र. ४** - उक्त जमिनीसाठी आवश्यक त्या सर्व मुलभूत/पायाभूत सेवा सुविधा संबंधित जमीन मालकांनी /विकासकर्त्यांनी स्वखर्चाने विकसित करुन पुरविणे बंधनकारक राहील.

**अट क्र.५** - उक्त फेरबदल प्रस्तावाखालील जमिनीमधील रस्त्यांचे जाळे सुयोग्य पध्दतीने नियोजित करणे जमीनमालक/ विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

**अट क्र.६** - उपरोक्त मूलभूत सुविधांचा विकास क्रमाने करताना, एकूण अपेक्षित सुविधांचा विकास टप्प्याने होत असताना अर्जदारांवर, एकूण जागेच्या भूखंड विक्रीवर पुढीलप्रमाणे बंधन राहील. मुख्याधिकारी, नगरपरिषद उमरगा यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवणे अभिप्त व आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ | अभिन्यास अंतीमतः मंजूर झाल्यानंतर | - | एकूण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील |
| ब | सुमारे ४०% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील |
| क | सुमारे ६०% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील |
| ड | सुमारे ८० % मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील |
| इ | सुमारे १००% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील |

वरील बाबत उल्लंघन झाल्याबाबत रेखाकंन व अकृषिक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

जर अभिन्यासात समुह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर मुख्याधिकारी, उमरगा नगरपरिषद, जि. धाराशिव यांनी विहित केल्यानुसार सर्व मुलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत मुख्याधिकारी, उमरगा नगरपरिषद, जि. धाराशिव यांच्या कार्यालयात, कार्यालयीन वेळेमध्ये नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरची अधिसूचना शासनाच्या www. maharashtra.gov.in /Acts &Rules या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

(प्रसाद रा. शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

---

## BY GOVERNMENT OF MAHARASHTRA
## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

**4TH Floor, Main Building, Mantralaya,**

**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**

**MUMBAI.400 032.**

## DATED : - 03/09/2025

## NOTIFICATION

***The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966:***

**No. TPS-3525/183/CR-16/2025/UD-30 :-** Whereas, the Development Plan of Umarga City, Dist. Dharashiv (Original Limits + Extended Limits) has been sanctioned by the Government, under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act. No.XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS- 3409/573/CR-73/2009/UD-30 dated the 04/04/2012 and has come into force with effect from the 15/05/2012 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land admeasuring 1.37 Hect. bearing Survey No.9 (Pt.) of Mauje Umarga (hereinafter referred to as "the said Land"*)* is in clued in "Agriculture Zone" ;

And whereas, as per the provisions of section 37*(1)* of the said Act, the Umarga Municipal Council, Dist. Dharashiv *vide* its Administrative Resolution No. 01, dated the 13/06/2024, has resolved to make modification in the said Development Plan, so as to delete the said Land from Agriculture Zone and to include the same in Residential Zone (hereinafter referred to as " the said Proposed Modification"*)* and accordingly submitted the proposal to the Government for sanction *vide* its Marathi letter No.351/2024, dated the 13/06/2024;

And whereas, after making necessary enquires and consulting the Director of Town Planning Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that, the said Proposed Modification should be sanctioned with certain conditions;

And whereas, the land owner of the said Land, has deposited 50 % the Government share of 5% Premium amount of Rs 1,91,800/- as per the rate of said Land as prescribed in the Annual statement of rates (ASR) for the prevailing year in the Government Treasury *vide* challan, dated the 04/08/2025, through the Assistant Director of Town Planning, Dharashiv Branch, Dharashiv and the remaining 50 % of the 5% premium amount of Rs. 1,91,800/- has been deposited with the Umarga Municipal Council, Dist. Dharashiv, dated the 31/07/2025;

Now, therefore in exercise of the powers conferred on it under sub-section *(2)* of section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby sanctions the said Proposed Modification by deleting the said Land from Agriculture Zone and including the land so released in Residential Zone, with certain conditions, for 1.37 Hect. land bearing Survey No. 9(part) of Mauje Umarga, as shown on plan and for that purpose amends the above said Notification dated the 04/12/1992 as follows:-

"*In the Schedule of Modifications appended to the Notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry*:-

ENTRY

"*The land admeasuring 1.37 Hect. land bearing Survey No. 9(Pt.) of Mauje Umarga, is deleted from Agriculture Zone and the land so released is included in Residential Zone as shown on plan, subject to following conditions-*"

**Condition No.1** - When developing any area of the proposed land, as per the relevant provisions of the sanctioned UDCPR -2020 regulations, it is mandatory to propose minimum of 10% recreational open space, along with a minimum of 10% amenity area. Additionally, 50% of this amenity area must be permanently reserved for open use, such as gardens, playgrounds, etc. The remaining amenity area should be developed as per regulation no. 3.5.1 of the sanctioned UDCPR.

**Condition No.2** - It is mandatory to properly develop the recreational open land and construct a boundary wall around it.

**Condition No.3** - It is mandatory for the concerned landowner / developer, to keep the natural water flow (nalla) located along the southern boundary of the subject land must in its original state without obstructing its natural flow.

**Condition No.4** - It is mandatory for the concerned landowners /developers to develop and provide all necessary basic/infrastructure facilities for the said land at their own expense.

**Condition No.5** - It is mandatory for the landowners / developers to properly plan the road network within the lands covered by the said modification proposal.

**Condition No.6** - While developing the above - mentioned basic facilities in a phased manner, the applicant will be restricted on the sale of plots from the total land as follows. The Chief Officer, Nagar Parishad, Umarga, is expected and required to monitor this matter.

| | | | |
|---|---|---|---|
| A | After final approval of layout | - | sale of 25 % of total plots shall be permissible |
| B | After completion of 40% of civic Amenities. | - | sale of 50 % of total plots flats shall be permissible |
| C | After completion of 60% of civic Amenities. | - | sale of 75 % of total plots shall be permissible |
| D | After completion of 80% of civic Amenities. | - | sale of 90 % of total plots shall be permissible |
| E | After completion of 100% of civic Amenities. | - | sale of 100 % of total plots shall be permissible |

*In case of violation of the above, the layout and non-agriculture permission shall be eligible for revocation.*

*If group housing is to be developed in the layout, occupation certificate should not be issued unless all the infrastructure facilities are developed.*"

A copy of the part plan showing the aforesaid sanctioned modifications shall be available in the office of the Chief Officer, Municipal Council, Dist. Dharashiv during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

This Notification shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in/Acts & Rules.

***By order and in the name of the Governor of Maharashtra.***

(Prasad R. Shinde)

**Under secretary to Government**

--------------------

२

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक :- १७/१०/२०२५**

**आदेश**

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६. :-***

**क्र. टिपीएस - ३७२५/प्र.क्र.१५९/२०२५/नवि -३० :-** ज्याअर्थी, लातूर शहर महानगरपालिकेची (सु. + वा.ह.) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना, अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ ) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे.) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३७००/४७१/सिआर-१५३(अ)/२०००/नवि- ३०, दि. ०२/०१/२००२ अन्वये मंजूर केली असून ती दि.१८/०२/२००२ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. लातूर, जि.लातूर मधील स.क्र.४१ मधील क्षेत्र (यापुढे "उक्त आरक्षित जमीन" असे संबोधिले आहे) आ.क्र.१७०- 'बगीचा'(यापुढे "उक्त आरक्षण" असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांचे समुचित प्राधिकरण लातूर शहर महानगरपालिका आहे. (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असा उल्लेख केला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षित जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील उक्त आरक्षित जमीनीपैकी स.क्र.४१ (पै.) मधील (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) क्षेत्राच्या मालकांनी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) नुसार नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त आरक्षणांसंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वये दि.१९/०८/२०१९ रोजी सूचना बजावली आहे. (यापुढे "उक्त सूचना" असा उल्लेख केलेला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.५४५६/२०२२ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.०६/०५/२०२४ रोजी अंतिम निर्णय पारीत केलेला आहे.

आणि ज्या अर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा उक्त जमीन संपादन करण्यासंबधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ (४) सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) मधील तरतूदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन लातूर शहर महानगरपालिकेच्या (सु.+ वा.ह.) विकास योजनेतील, मौ. कन्हेरी, जि. लातूर, स.क्र. ४१(पै.) मधील परिशिष्टात नमूद केल्यानुसार सुचनाकर्ते यांच्या मालकीच्या क्षेत्रावरील आ.क्र.१७० बगीचा हे आरक्षण व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे आरक्षणांतून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीनमालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

**परिशिष्ट**

| अ. क्र. | गावाचे नांव तालुका व जिल्हा, | जमिनीचा सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र (अंदाजे) | मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १. | मौ. कन्हेरी. जि. लातूर | स. क्र. ४१ (पै.) | सुचनाकर्ते यांच्या मालकीचे एकूण बाधित क्षेत्र | आ.क्र.१७० - बगीचा (भागशः) |

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,**

(प्रसाद रा. शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**BY THE UNDER SECRETARY TO GOVERNMENT**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**Urban Development Department**

**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**

**Mantralaya, Mumbai 400 032.**

**Dated : - 17/10/2025**

**ORDER**

***The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966:***

**No. TPS - 3725/C.R.159/2025/UD - 30 :-** Whereas, the Revised Development Plan of Latur City has been sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act") *vide* Notification No. TPS - 3700/471/ CR-153(A)/2000/ UD - 30, dt. 02/01/2002 and has come into force with effect from dt.18/02/2002 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land bearing Survey No. 41 of Mauje Latur, Dist Latur (hereinafter referred to as " the said Reserved Land") is reserved for 'Site No. 170 - Garden', (hereinafter referred to as "the said Reservation");

And whereas, the Latur Municipal Corporation is "Appropriate Authority" for the said Reservation. (hereinafter referred to as "the said Appropriate Authority")

And whereas, the said Reserved Land has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

Ànd whereas, the Owners of the land bearing Survey No. 41 (Part) of Mauje Latur, Dist. Latur (hereinafter referred to as "the said Land") out of the said Reserved Land, in reference to the Said Reservation, had served a notice dated 19/08/2019 under section 127(1) of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126 (4) of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of said Notice under sub- section (1) of section 127 of the said Act;

And whereas, the owners of the said Land have filed Writ Petition No. 5456/2022 before the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench, and the final order is passed on dated the 06/05/2024 by the Hon'ble High Court;

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of service of Notice, nor Notification of land acquisition required under section 126(4) of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservation on the said Land stands lapsed as per the provisions of section 127*(1)* of the said Act;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that, the said Reservation i.e. 'Site No. 170 - Garden' as specified in the Santioned Development Plan of Latur City (Revised and Extended Limit), stands lapsed to the extent of area owned by noticer bearing Survey No. 41 (Part) of Mauje Kanheri. Dist. Latur and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.

**ANNEXURE**

| Sr. No. | Name of the Village, Taluka and Dist. | Survey No./ Hissa No. | Area lapsed under section 127 *(2)* of the said Act | Reservation of sanc- tioned Develop- ment Plan |
|---|---|---|---|---|
| 1 | Mauje Kanheri, Dist Latur | Survey No. 41 (Part) | Affected Area Owned by the Noticer | 'Site No. 170 - Garden' (Partly) |

A copy of the Part Plan, showing the area of the said Modified Reservation which has been lapsed *vide* this Order, is available in the office of the Commissioner, Latur Municipal Corporation, Dist. Latur during office hours on all working days for inspection of public for the period of One month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts/Rules).

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

(Prasad R. Shinde)
**Under Secretary to Government**

-----------------------

# संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

३

**उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी जालना. यांजकडून भुमीसंपादन, पुनर्वसन पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम १९ (१) ची अधिसुचना शुध्दीपत्रक**

**दिनांक- ०२/०१/२०२६**

**जा.क्र.२०२५/उविअ/भूसंपादन/सिआर-१९/२५.-** ज्याअर्थी समुचित शासन असलेल्या जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भुमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचीत भरपाई मिळण्याचा आणी पादर्शतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, **अधिसुचना दिनांक १०/०९/२०२५** अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढली आहे आणी त्या द्वारे असे अधिसुचीत केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीनीची अनुसूची दोन मध्ये अधि तपशीलवार विनिदिष्ट केलेल्या सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.)

ज्याअर्थी जालना जिल्ह्यातील जिल्हाधिकारी जालना कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणता ही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनी संपादीत करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्यांची खात्री पटली आहे म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतूदी मध्ये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे. असे या द्वारे घोषीत करण्यात येत आहे आणि ज्याअर्थी अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणून निर्धारीत केले असल्याचे या द्वारे घोषीत केले असून पुनर्वसन व पुर्नवसाहत या योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनीर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या अन्वये सुचीत शासन असलेल्या जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमा मध्ये जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी जालना यांना अधिसुचना काढण्यापूर्वी पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची -१**
**जमीनीचे वर्णन**

**गांव : पिरकल्याण तालुका : जालना जि. जालना**

| अ. क्र. | भुमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र हेक्टर मध्ये |
|---|---|---|
| १ | १४१ | ०.२० |
| | **एकूण** | **०.२०** |

**अनूसूची-२**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :-** पाझर तलाव क्र. **०३ मौ. पिरकल्याण ता. जि. जालना**

**प्रकल्पाचे कार्याचे वर्णन :- मौ. पिरकल्याण ता. जि. जालना** येथील पाझर तलाव क्र. ०३ च्या संपादनाबाबत

**समाजाला मिळणाले लाभ** - या प्रकल्पामुळे **मौ. पिरकल्याण ता. जि. जालना** येथील जमीन ओलीताखाली येणार आहे. **पिरकल्याण** पाझर तलाव क्र. ०३ मुळे त्या लाभक्षेत्रातील जमीनीचे पाणीपातळी भरपूर प्रमाणात वाढ होणार आहे. तसेच गावाच्या पिण्याच्या पाण्याचा, जनावराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या पाझर तलावाच्या कामामुळे बेरोजगांराना रोजगाराची संधी मिळणार आहे. तसेच संपादना क्षेत्रालगतची जमीन ओलीत होणार असून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होणार आहे व पर्यायाने खेड्यातील जीवनमानामध्ये सुधारणा होणार आहे.

**अनुसूची-३**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यात भाग पाडणारी कारणे-** सदरचा प्रकल्प हा सिंचन क्षेत्रातील जमीन अधीकाधिक फायदेशीर उत्पन्न देणारी व लाभदायक व्हावी यासाठी **पिरकल्याण** पाझर तलाव क्र. ०३ चे संपादन करण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम व सखोल शेतजमीनीवर असून त्यास शेतकऱ्यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाणबाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापित होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची-४**

**सामाजिक-परिणाम निर्धारणाचा सारांश**

लागू नाही

टिपः उक्त जमीनीच्या नकाशाचे वर्णन उपविभागीय अधिकारी जालना जि. जालना यांचे कार्यालयात निरीक्षणा करीता ठेवण्यात आले आहे.

दिनांक :
ठिकाण : जालना

**(रामदास दौंड)**
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी जालना.

---

**४**

**उपविभागीय अधिकारी परतूर जि.जालना**

**भूमीसंपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19 (1) खालील अधिसुचनाः**

**जा.क्र.2024/भूसंपादन/सीआर-43/2024 दिनांक 26.12.2025.-** ज्याअर्थी,समुचित शासन असलेल्या जालना जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी भूसंपादन, पुनर्वसन,पुर्नव्यवथापन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चा 30 (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) ज्याच्या कलम 11 च्या पोट कलम (1) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसुचना क्रमांक 2024/भूसंपादन/सिआर-43/2024 दिनांक 1.8.2025 अन्वये प्रारंभीक अधिसुचना काढलेली आहे आणि ज्याव्दारे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचि 1 मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची अनुसुचि 2 मध्ये अधिक तपशिलवार विर्निदिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनार्थ आवश्यक आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी ,जालना जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी कलम 15 च्या पोट कलम 2 अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे. या बाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोट कलम (1) च्या तरतुदी अन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येते.

आणि ज्याअर्थी,अनुसूचि 3 मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटूंबाच्या पुर्नवसन, पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुर्नवसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसूचि 4 मध्ये विर्निदिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या 3 च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी परतूर यास (अधिसुचना काढण्यापुर्वी अधिकाऱ्याचे नाव व पत्ता नमूद करावा पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसुचि एक**

**संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन**

**गावाचे नाव : माळतोंडी तालूका: मंठा जि.जालना**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक गट क्रमांक | अंदाजीत संपादीत क्षेत्र हे आर |
|---|---|---|
| 1. | 33 | 0.60 |
| 2. | 33 | 0.65 |
| 3. | 33 | 0.40 |
| 4. | 33 | 0.28 |
| | एकूण | 1.93 |

**अनुसुचि दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाचे स्वरुप बाबत वर्णन**

प्रकल्पाचे नाव : मौजे माळतोंडी ता.मंठा जि. जालना येथील गट क्रमांक-33 मधून 01 हे. 93 आर जमीन पाझर तलाव क्रमांक 09 करीता भूसंपादन करणे बाबत.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : मौजे माळतोंडी ता.मंठा जि. जालना येथील गट क्रमांक-33 मधून 01 हे. 93 आर जमीन पाझर तलाव क्रमांक 09 करीता भूसंपादन करणे बाबत.

**समाजास होणारे लाभ :** मौजे पाझर तलावाचे पाण्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढेल त्याचा गावक-यांना लाभ होईल.

**अनुसुचि तीन**

**पुर्नवसाहत क्षेत्राबातचे वर्णन**

गावाचे नाव : निरंक

तालुका : निरंक

जिल्हा : निरंक

**अनुसुचि चार**

**पुर्नवसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश**

**निरंक**

टीप :- उक्त जमीनीच्या नकाशे उपविभागीय अधिकारी कार्यालय परतूर जि.जालना यांचे कार्यालयात निरिक्षणा करिता ठेवले आहे.

ठिकाण : परतूर

दिनांक :26/12/2025

**स्वाक्षरीत/-**

**(पदमाकर गायकवाड)**

उपविभागीय अधिकारी

परतूर जि.जालना .

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. १] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ८-१४, २०२६ : पौष १८-२४, शके १९४७ [किंमत : ०.०० रुपये

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–अ-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले व महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)

**टीप :–**प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.

**१**

**मुख्याधिकारी नगरपरिषद पाथरी, यांजकडून**

**जाहिर नोटीस**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल प्रस्ताव**

**क्र./नपपा./नगर रचना/कलम ३७(१)/६६३/२०२५, दिनांक २९/१२/२०२५.** ज्याअर्थी पाथरी शहराची सुधारीत विकास योजना शासनाने पाथरी विकास योजना (सु+वाक्षे) शासन निर्णय क्र.टीपीएस-३१०६/४९८/ सीआर/१०७(A)/ २००६/युडी-३०/२२/१२/२००६ अन्वये मंजूर झाली असून त्याची अंमलबजावणी दि.०१/०३/२००७ पासुन सुरू झाली आहे. तसेच पुनःप्रसिध्द विकास योजना टीपीएस-३१०८/४५४/सीआर८०/(B)/०८/युडी ३० २१/०५/२०१० अन्वये मंजूर झाली असून त्याची अंमलबजावणी दि.२१/०६/२०१० पासून सुरू झाली आहे.

उक्त विकासयोजनेमध्ये (सु+वाक्षे) प्रमाणे मौजे माळीवाडा येथील सर्वे नं. १० मध्ये खेळाचे मैदान (Play Ground) (साईट नं.५०) आहे आणि ज्याअर्थी उक्त विकास योजनेतील सर्वे नं. १० मधील खेळाचे मैदान (एकुण क्षेत्र २.०० हे.पैकी १.०० हे) असलेली जागा रहिवासी भागात समाविष्ट करण्यासाठी फेर बदलाची कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत श्री अमित नारायणराव चौधरी यांच्या मार्फत विनंती करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी पाथरी नगर परिषदेने प्रशासकीय ठराव दि. ३०/१०/ २०२५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम ३७ (१) चे कलम १९६६ मधील तरतुदीनुसार पाथरी नगर परिषद हद्दीतील मौजे माळीवाडा सर्वे नं. १० मधील अर्जदार यांच्या मालकीच्या जमिनीवरील खेळाचे मैदान (साईट नं. ५०) (एकुण क्षेत्र २.०० हे. पैकी १.०० हे) वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करणे बाबत फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी उपरोक्त फेरबदल दर्शविणारा विकास योजनाचा भाग नकाशा पाथरी नगर परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे. तसेच उक्त अधिनियमांच्या कलम ३७ (१) अन्वये सदरची अधिसूचना शासन रापत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या आत जनतेकडून सूचना व हरकती मागवीत आहे. याची कृपया नागरिकांनी नोंद घेवून नगर परिषदेस सहकार्य करावे.

ठिकाणः पाथरी

दिनांक : २९/१२/२०२५

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद पाथरी.**

**BY THE CHIEF OFFICER MUNICIPAL COUNCIL PATHRI**

**PUBLIC NOTICE**

**Modification under section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning act, 1966**

**Dt. 29.12.2025**

**No./MCP/TP/Section 37(1)/663/2025.--** Whereas the Government in Urban Development Department *vide* its Notification No TPS-3106/498/CR-107(A)/2006/UD-30 Dt.22/12/2006 sanctioned the Development Plan of Pathri and which came into force from Dt.01/03/2007. Republished part of Development Plan sanctioned by vide Urban development Department Notification TPS- 3108/454/CR-80(B)/08/UD-30 Dt.21/05/2010 came into force from dated 21/06/2010.

In the above Development Plan land under Survey no.10 at.MaliwadaTq. Pathri is proposed for Play Ground (Site no.50) total 02 ha.00 Aar and whereas on behalf of Mr. Amit Narayanrao Chaudhari land from said development plan survey no. 10 Play Ground (Approx. 01 ha. 00 Aar) is requested to be deleted from Play Ground and include in the Residential Zone and same to be submitted to Government.

In that sense, Pathri Municipal Council passed the Administrative Resolution dated 30/10/2025, as per the provision of Section 37 (1) of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act 1966 to proposed a modification proposal to the Government regarding excluding Play Ground(Site no.50) (Approx 01 ha. 00 Aar) and including in the Residential zone on land of applicant of Survey no. 10 within the Pathri Municipal Council Limit. In that sense, the part map of the Development Plan showing

The above changes has been placed in the office of the Pathri Municipal Council for public inspection during office hours. Also, under section 37 (1) of the said act, suggestions and objections are requested from the public within 30 days from the date of publication of the said notification in the Government Gazette. Citizen please take note of this and cooperate with the Municipal Council.

Place- Pathri

Date:-29/12/2025

**Chief Officer**
**Municipal Council Pathri.**

--------------------------------

२

**प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी, नगर परिषद हदगाव यांजकडून**

**प्राथमिक ठराव**

**हदगाव नगरपरिषद प्रशासकीय सभा दि. ३०/१०/२०२५**

**ठराव क्रमांक-०१**

**ह.न.प.जा.क्र./नगररचना विभाग/३५१३/२०२५.–**

**दिनांक - ३१/१०/२०२५**

**विषय क्र. १ :-** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षण क्र. १८ आरक्षण हेलिपॅड रद्द करुन त्याचे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबत.

हदगाव शहराची विकास योजना ही महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक टिपीएस-३२२३/८०/प्र.क्र.१६/२०२३/ वि.यो. मंजूरी (भागशः)/ नवि-३० दि. ११.०९.२०२५ अन्वये मंजूर केले आहे. उक्त विकास योजनेत मौजे हदगाव सर्वे क्र. २४९ ची जागा आरक्षण क्रमांक १८ हेलिपॅड या आरक्षणासाठी राखीव असून सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण हदगाव नगर परिषद हे आहे.

अर्जदार श्री शेख वसीम शेख अजीमुद्दीन व श्री शेख अझहर शेख जमिरुद्दीन यांचा नगरपरिषद दि. २९/०७/२०२५ रोजीचा विनंती अर्जाच्या अनुषंगाने सदर आरक्षण क्रमांक १८ सर्वे नं. २४९ हे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन ना-विकास क्षेत्र विभागातून रहिवासी विभागात समाविष्ट करण्याचे प्रयोजिले आहे. त्यामुळे उक्त आरक्षणात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर फेरबदल बाबत सूचना राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात मराठी व इंग्रजी भाषेत प्रसिध्द करुन नागरिकांकडुन विहित मुदतीत हरकती / सुचना मागविण्यात याव्यात. उपरोक्त बाबी पाहता नगरपरिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे ३७ अंतर्गत पुढील कार्यवाहीस मा. मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव यांना अधिकार देण्यात येत आहे. त्यांनी आवश्यक ती संपूर्ण वैधानिक कार्यवाही करावी.

**(अविनाश कांबळे)**
**प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी**
**नगर परिषद हदगाव.**

**BY ADMINISTRATOR AND**

**SUB-DIVISIONAL OFFICER, MUNICIPAL COUNCIL, HADGAON**

**Preliminary resolution**

**Hadgaon Municipal Council Administrative Meeting Date 30/10/2025**

**Resolution No.-01**

ह.न.प.जा.क्र./नगररचना विभाग/३५१३/२०२५.–
दिनांक - ३१/१०/२०२५

**Subject No. 1:-** Regarding cancellation of reservation No. 18 reservation helipad under section 37 of Maharashtra Regional Planning and Town Planning Act 1966 and inclusion of its area in the residential section.

The Development Plan of Hadgaon City has been approved by the Government of Maharashtra vide Government Decision No. TPS-3223/80/P. No. 16/2023/ V. Yo. Sanction (Partial) /Navi-30 dated 11.09.2025.In the said development plan, the land of Village Hadgaon Survey No. 249 is reserved for reservation No. 18 Helipad and the appropriate authority for the said reservation is Hadgaon Municipal Council.

In accordance with the request application of the applicant Shri Sheikh Wasim Sheikh Azimuddin and Shri Sheikh Azhar Sheikh Jamiruddin to the Municipal Council dated 29/07/2025, the said reservation number 18 survey no. 249 is proposed to amend the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966, under Section 37, to include the non-development area section in the residential section. Therefore, approval is being given to modify the said reservation under Section 37 of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966. Also, notices regarding the said changes should be published in the Gazette and local newspapers in Marathi and English and objections/suggestions should be sought from the citizens within the prescribed time limit. In view of the above, the Municipal Council is authorizing the Hon'ble Chief Officer, Municipal Council, Hadgaon, to take further action under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. He should take all necessary legal action.

**(Avinash Kamble)**
Administrator and Sub-Divisional Officer,
Municipal Council, Hadgaon.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.